# मुंबई विद्यापीठ

क्र. घ. म./ १५ /२०१४—२०१५

संदर्भ:—१) विद्यापीठ परिपत्रक क्रमांक घ.म./४८/२००९ दिनांक ३१ जानेवारी २००९
२) विद्यापीठ परिपत्रक क्रमांक घ.म./७३/२०१० दिनांक १६ एप्रिल, २०१०
३) विद्यापीठ परिपत्रक क्रमांक घ.म./५५/२०११ दिनांक १० मार्च, २०११
४) विद्यापीठ परिपत्रक क्रमांक घ.म./९५/२०११ दिनांक ३० मे, २०११
५) विद्यापीठ परिपत्रक क्रमांक घ.म./३७७/२०११ दिनांक ८ नोव्हेंबर २०११
६) विद्यापीठ परिपत्रक क्रमांक घ.म./०१/२०१२ दिनांक २१ जानेवारी, २०१२
७) विद्यापीठ परिपत्रक क्रमांक घ.म./१२/२०१२ दिनांक २८ मे, २०१२
८) विद्यापीठ परिपत्रक क्रमांकघ.म./३७/२०१२ दिनांक २२ फेब्रुवारी, २०१३
पहावे.

परिपत्रक :—

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व अशासकीय अनुदानीत व विनाअनुदानीत कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, अध्यापक, नृत्य महाविद्यालयांचे प्राचार्य व महाविद्यालयातर्फे संबंधित संस्थाचे अध्यक्ष/सचिव यांना कळविण्यात येते की, प्राचार्य व शिक्षकांची पदे महाविद्यालयांमध्ये प्राधान्याने भरावीत असे विद्यापीठामार्फत वेळोवेळी परिपत्रके निर्गमित करुन कळविण्यात आलेले असून सुध्दा बऱ्याच महाविद्यालयात याबाबत कार्यवाही करण्यात आलेली नाही असे निदर्शनास येत आहे.

विद्यापीठाने निर्गमित केलेले विद्यापीठ परिपत्रक क्र. घ.म./३७/२०१२ दि. २२ फेब्रुवारी, २०१३ अन्वये महाविद्यालयाने प्राचार्य व शिक्षकांची पदे भरली नाहीत तर विद्यापीठ कायदा १९९४ कलम (९१) अन्वये कडक कारवाई करण्यात येईल अशी सक्त ताकीद देऊन सुध्दा महाविद्यालये पदे भरण्याची कार्यवाही करण्याची बाब गांभीर्याने घेत नाहीत असे दिसून येत आहे.

सदरबाबत शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे—१, यांनी पत्र क्रमांक. अमवि/२०१४/६४६३/४९६४५/४९७१५/मुंवि/पवि/मवि—२/५२२७ दि. २१/०६/२०१४ अन्वये आदेशित केलेले आहे की, प्राचार्यांची रिक्त पदे भरणेबाबत संबंधित महाविद्यालयास विद्यापीठामार्फत सहा महिन्यांची मुदत द्यावी. जर सहा महिन्यात महाविद्यालयांनी प्राचार्यांची पदे भरली नाहीत तर महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ नुसार कारवाई करण्याची नोटीस द्यावी.

त्यामुळे ज्या महाविद्यालयांमध्ये प्राचार्य पद व शिक्षक पदे नियमानुसार भरलेली नाहीत अशा संस्थाना याद्वारे पुन्हा सूचित करण्यात येते की, मा. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) यांच्या आदेशानुसार सहा महिन्याच्या आत प्राचार्य पद रिक्त असल्यास ते भरण्याची कार्यवाही पूर्ण करावी व तसा अहवाल विद्यापीठास विनाविलंब सादर करावा. अन्यथा सदर संस्थावर महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ नुसार कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

15/9/14

मुंबई — ४०० ०३२.
दिनांक :— 9५/09/२०१४

(डॉ. एम्. ए. खान)
कुलसचिव
मुंबई विद्यापीठ

..२/—

प्रति,

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व अशासकीय अनु ानीत व विनाअनुदानीत कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, अध्यापक, नृत्य महाविद्यालयांचे प्राचार्य व महाविद्यालयातर्फे संबंधित संस्थाचे अध्यक्ष/ सचिव यांचे माहितीसाठी आणि पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत माहीतीस्तव सादर :—

१) .मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई— ३२.
२) डॉ. प्र.रा.गायकवाड, प्र.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे—४११ ००१.
३) मा. सह—संचालक, मुंबई विभाग, महापालिका मार्ग, मुंबई — ४०० ००१.
४) मा. सह—संचालक, कोकण विभाग, पनवेल, जिल्हा — रायगड — ४१० २०६.
५) सह—संचालक, टेक्नीकल एज्युकेशन डिपार्टमेंट, खेरवाडी, बांद्रा (पू), मुंबई—४०००५१.
६) मा. कुलगुरूंचे कार्यकारी सचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई — ४०० ०३२.
७) स्वीय सहाय्यक, प्र—कुलगुरू, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई — ४०० ०३२.
८) स्वीय सहायक, कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई — ४०० ०३२.
९) स्वीय सहायक, संचालक, बीसीयुडी, फोर्ट, मुंबई — ४०० ०३२.
१०) समन्वयक, विद्यापीठ संगणकीय केंद्र (यु.सी.सी.),कलिना, सांताक्रुझ,मुंबई — ४०० ०९८.
११) अभिलेखा विभाग (रेकॉर्ड सेक्शन) (१० प्रती).

(डॉ. एम्. ए. खान)
कुलसचिव
मुंबई विद्यापीठ

Circular Marathi / 23714 correction 24714, 28714, 14814 & final 12914